ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारतीय स्टेट बँकेचे निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत योगदान

**डॉ. रुपेश वामनराव खुबाळकर***
*सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग*
*नूतन आदर्श कला, वाणिज्य व श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड*

**डॉ. गजानन गोपलराव बाबडे****
*सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग*
*नूतन आदर्श कला, वाणिज्य व श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड*

***सारांश***
*निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत व्यवसाय संघटनाद्वारे त्यांच्या व्यवसाय कार्यासोबत सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणविषयक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील काही कंपन्या, बँका ह्या अगोदरपासून सामाजिक दायित्व निभविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. कंपनी कायदा 2013 नुसार कंपन्यांसाठी मागील सतत तीन वर्षांच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या कमीत कमी 2 टक्के निगमिय सामाजिक जबाबदारीवर खर्च करणे बंधनकारक करण्यात आले आहे. निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत भारतीय स्टेट बँकेने केलेली कामगिरी प्रशंसनीय आहे. कोविड–19 च्या काळात भारतीय स्टेट बँकेने सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून सहाय्य केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय स्टेट बँकेने निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत केलेल्या कार्याचे अध्ययन केले आहे.*

***मुख्य शब्द***
*सामाजिक जबाबदारी, आर्थिक विकास, भारतीय स्टेट बँक, योगदान, कोविड–19*

**प्रस्तावना**
व्यावसायिक क्षेत्राचा मुख्य उद्देश व्यवसाय करून नफा कमविणे आहे. परंतु व्यवसायाची सामाजिक जबाबदारी सुद्धा आहे. व्यवसायाद्वारे त्यांच्या व्यवसाय कार्यासोबत सामाजिक आणि पर्यावरणविषयक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. टाटा, रिलायन्स सारख्या कंपन्या तसेच निगमिय संस्था सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून सामाजिक कार्यात योगदान देत आलेल्या आहेत. महात्मा गांधींनी सामाजिक–आर्थिक वाढीस मदत करणारी ट्रस्टीशिपची संकल्पना मांडली होती. त्याच प्रेरणेतून आता कंपनी कायदा 2013 द्वारे मोठ्या कंपन्याना 'निगमिय सामाजिक जबाबदारी' ची तरतूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. निगमिय सामाजिक जबाबदारी म्हणजे कंपन्या आता स्वेच्छेने समाजाच्या विकासासाठी व देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी योगदान करतील. कोविड–19 च्या परिस्थितीत अनेक कंपन्यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून सहाय्यता केली आहे.

**उद्देश**
शोधनिबंधाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.
- निगमिय सामाजिक जबाबदारीचे अध्ययन करणे.
- निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत भारतीय स्टेट बँकेच्या योगदानाचे अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**
शोध निबंधासाठी माहितीचे संकलन पुस्तके, मासिक, वर्तमानपत्र व वेबसाईट वरून घेण्यात आली आहे .

**निर्गमिय सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility - CSR)**
भारतीय कंपनी कायदा, 2013 च्या कलम 135 तरतुदीनुसार 1 एप्रिल 2014 पासून कंपन्यांसाठी 'निगमिय सामाजिक जबाबदारी – CSR' चे निर्धारण करण्यात आले आहे. निगमिय सामाजिक जबाबदारीसाठी प्रत्येक कंपनीच्या संचालक मंडळाला एक 'निगमिय सामाजिक जबाबदारी समिती' तयार करणे बंधनकारक आहे. या समितीत सार्वजनिक कंपनीसाठी कमीत कमी तीन संचालक तर खाजगी कंपनीसाठी कमीत कमी दोन संचालक राहतील ज्यापैकी एक स्वतंत्र संचालक राहील. खालील कंपन्यांसाठी मागील सतत तीन वर्षांच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या कमीत कमी 2 टक्के निगमिय सामाजिक जबाबदारीवर खर्च करणे बंधनकारक राहील.
- ज्या कंपनीची शुद्ध संपत्ती 500 कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असेल, किंवा
- ज्या कंपनीची वार्षिक उलाढाल 1000 कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असेल, किंवा
- अशी कंपनी, जिचा निव्वळ नफा 5 कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असेल.

<u>निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत खालील कार्य करण्यासाठी खर्च केल्या जाऊ शकतो:</u>
- उपासमारी आणि दारिद्रय, निर्मूलनासाठी.
- शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी.
- स्त्री –पुरुष समानतेला प्रोत्साहन देणे आणि महिलांचे सक्षमीकरण करणे.
- बालमृत्यू दर कमी करणे.
- मातृ आरोग्य सुधारणे.
- विषाणूजन्य रोग, मलेरिया व इतर रोग दूर करणे.
- पर्यावरण सुरक्षा निश्चित करणे.
- रोजगार, व्यावसायिक कौशल्ये, सामाजिक व्यवसाय प्रकल्प विकसित करणे.
- प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधी किंवा सामाजिक–आर्थिक विकासासाठी केंद्र सरकार किंवा राज्य सरकारांनी स्थापन केलेल्या इतर कोणत्याही निधीमध्ये योगदान देणे.

- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यक व महिलांच्या कल्याणासाठी मदत आणि निधीमध्ये देणगी देणे.
- ग्रामीण विकासाचे प्रकल्प उभारणे.
- राष्ट्रीय ऐतिहासिक वारस्याचे संरक्षण करणे.
- सैनिक, सैनिकांच्या विधवा, त्यांचे आश्रित यांच्या लाभासाठी प्रयत्न करणे.

**भारतीय स्टेट बँकेचा इतिहास**

भारतीय स्टेट बँकेची स्थापना 19 व्या शतकाच्या पहिल्या दशकातील आहे. इंग्रजांनी 2 जून 1806 रोजी बँक ऑफ कलकत्ताची स्थापना केली होती. बँक ऑफ कलकत्ताची बँक ऑफ बंगाल म्हणून पुनर्रचना करण्यात आली. 2 जानेवारी 1809 रोजी ब्रिटीश किंग जॉर्ज तिसरा यांच्याकडून बँकेला सनद मिळाली. अश्याप्रकारे ती बंगाल सरकार द्वारे प्रायोजित ब्रिटिश भारताची पहिली संयुक्त स्कंध बँक बनली. त्यानंतर, 15 एप्रिल 1840 रोजी बँक ऑफ बॉम्बेचा आणि 1 जुलै 1843 रोजी बँक ऑफ मद्रासचा त्यात समावेश करण्यात आला. या तीन बँका 1921 पर्यंत भारतातील आधुनिक बँकिंगच्या शिखरावर राहिल्या आणि प्रेसिडेन्सी बँक म्हणून त्यांनी काम केले. ब्रिटीश भारत सरकारने 27 जानेवारी 1921 रोजी या तिन्ही प्रेसिडेन्सी बँकांचे विलीनीकरण करून इम्पीरियल बँक ऑफ इंडिया म्हणून पुनर्रचना केली. ए. डी. गोरवाला समितीच्या शिफारशीनुसार इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचे 1 जुलै 1955 रोजी भारतीय स्टेट बँकमध्ये रूपांतर करून राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

**सामाजिक निगमिय जबाबदारी आणि भारतीय स्टेट बँक**

भारतीय स्टेट बँक ही बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक आहे. भारतीय स्टेट बँक सामाजिक दायित्व निभविण्यासाठी कटिबद्ध आहे. 1973पासून सक्रियपणे बँक सामाजिक जबाबदारीच्या क्रियाकलापांमध्ये सामील आहे. त्यांच्या निगमिय सामाजिक जबाबदारीचा प्राथमिक हेतू देशातील आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या आव्हानात्मक समुदायांच्या जीवनावर अर्थपूर्ण आणि यथायोग्य प्रभाव पाडणे हा आहे. भारतीय स्टेट बँकेने 'निगमिय सामाजिक जबाबदारी' या उपक्रमा अंतर्गत देशभरातील लाखो गरीब आणि गरजू लोकांना सहाय्यता केली आहे. बँकेच्या 'निगमिय सामाजिक जबाबदारी' उपक्रमांमध्ये आरोग्य सेवा, शिक्षण, आजीविका, कौशल्य विकास, पर्यावरण संरक्षण, महिलांचे सक्षमीकरण, ज्येष्ठ नागरिक सेवा इत्यादींचा समावेश आहे.

**भारतीय स्टेट बँकेचे निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत कार्य**

वित्तीय वर्ष 2018–19 मध्ये, बँकेचा निव्वळ नफा 862 कोटी रुपये होता आणि नफ्याच्या 1 टक्के म्हणजेच 8. 62 कोटी रुपयांना वित्त वर्ष 2019–20 साठी निगमिय सामाजिक जबाबदारी निधी म्हणून अंदाजित करण्यात आले होते. तथापि, भारतीय रिझर्व बँकेच्या मंजुरीने, भारतीय स्टेट बँकेने आपल्या निगमिय सामाजिक जबाबदारी वचनबद्धतेअंतर्गत विविध उपक्रमांसाठी एकूण 27.47 कोटी रुपयांचे योगदान दिले.

वित्तीय वर्ष 2019–20 दरम्यान, कोविड –19 साथीच्या आजाराशी लढण्याच्या प्रयत्नात भारतीय स्टेट बँकेच्या कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे 108 कोटी रुपये पी एम केअर फंडला देणगी दिली आहे. भारतीय स्टेट बँकेने कोविडशी संबंधित निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत उपक्रमांसाठी 30 कोटी रुपये दिले आहेत तसेच सुमारे 21000 पीपीई किट सरकारी रुग्णालये यांना दान केले आहे. महामारीच्या सुरुवातीच्या टप्प्यात बँकेने आपल्या वार्षिक नफ्याच्या 0.25 टक्के (वित्त वर्ष 2019–20) भारतातील कोविड –19 च्या प्रादुर्भावाच्या परिस्थितीशी लढण्यासाठी खर्च करण्याचा निश्चय केला होता. याव्यतिरिक्त, 2021 मध्ये लसीकरण सुरू होताच, सरकारच्या कोविड –19 लसीकरण मोहिमेच्या पुढील टप्प्याला समर्थन देण्यासाठी, भारतीय स्टेट बँकेने रु.11 कोटी पी एम केअर फंडासाठी दिलेत. मार्च 2021 मध्ये बँकेने मुंबई पोलीस फाउंडेशनला कोविड योद्धयांसाठी पाठिंबा देत आणि कौतुक दाखवत 1 कोटी रुपये देणगी दिली.

याव्यतिरिक्त भारतीय स्टेट बँकेने सामाजिक निगमिय जबाबदारी अंतर्गत केलेले कार्य खालीलप्रमाणे आहेः

- वित्तीय वर्ष 2019–20 मध्ये भारतीय स्टेट बँकेने दुर्गम भागातील, समाजातील दुर्बल घटकांना शिक्षण देण्यासाठी 1.13 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.
- वित्तीय वर्ष 2019–20 मध्ये आर्थिकदृष्ट्या समाजातील दुर्बल घटकांना आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी भारतीय स्टेट बँकेने 1.75 कोटी रुपये रुग्णालयांतील मूलभूत पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय सुविधा सुधारण्यासाठी खर्च केले आहेत.
- वित्तीय वर्ष 2019–20 मध्ये भारतीय स्टेट बँकेने मनुष्यबळाच्या प्रशिक्षित करण्यासाठी कौशल्य विकास उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत बँकेने देशातील तरुणांची बेरोजगारी आणि बेरोजगारी समस्या सोडवण्यासाठी 152 ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (रसेटी) स्थापन केल्या आहेत. याकरिता, वित्तीय वर्ष 2019–20 मध्ये बँकेने 1 कोटी रुपये खर्च केले आहे.
- वित्तीय वर्ष 2019–20 दरम्यान, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सक्षमीकरणासाठी 0.42 कोटी रुपये रक्कम खर्च करण्यात आली.
- वित्तीय वर्ष 2019–20 दरम्यान 1.10 कोटी रक्कम पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेसाठी खर्च करण्यात आली आहे. यासाठी, बँकेने भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी एकल वापर प्लास्टिकच्या बाटल्यांच्या संकलनाकरून पुनर्वापरासाठी स्मार्ट क्रशिंग बिन्स बसवण्याची व्यवस्था केली आहे. शिवाय, वृक्ष लागवडीचे मोठे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत

आणि संपूर्ण भारतात चार लाख झाडे लावली गेली आहेत.

- वित्तीय वर्ष 2019–20 दरम्यान, बँकेच्या कर्मचार्यांकडून एकूण 0.45 कोटी रुपयांचे योगदान प्राप्त झाले आहे आणि बँकेने 0.53 कोटींची रक्कम सहा संस्थांना बाल कल्याणासाठी दिली आहे. या संस्था देशभरात अल्पभूधारक आणि दलित मुलांच्या कल्याणासाठी कार्य करतात.
- वित्तीय वर्ष 2019–20 मध्ये 9.00 कोटी रुपये चक्रीवादळ, पुरासारख्या संकटामुळे होणाऱ्या हानीसाठी विविध राज्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी देणगी म्हणून दिले आहे.

**निष्कर्ष**

देशातील सामाजिक, आर्थिक, पर्यावरण विषयक समस्या सोडवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. निगमिय सामाजिक जबाबदारी संकल्पनेअंतर्गत सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील संघटना आता या समस्या सोडवण्यासाठी योगदान करीत आहेत. भारतीय स्टेट बँकेने निगमिय सामाजिक जबाबदारी अंतर्गत केलेली कामगिरी अतुलनीय आहे. भारतीय स्टेट बँकेने केलेल्या प्रयत्नाने भारतातील ग्रामीण आणि अल्प विकसित समुदायाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात मोठा फरक पडला आहे. देशातील सर्वसमावेशक विकासाला आधार देण्यासाठी भारतीय स्टेट बँकेने 'बँकिंग पलीकडे सेवा' देण्याची संधी स्वीकारली आहे. कोविड–19 च्या काळात बँकेने सामाजिक निगमिय जबाबदारीचे भान ठेवून अर्थसहाय्य केले आहे. वित्तीय वर्ष 2019–20 मध्ये भारतीय स्टेट बँकेने सामाजिक निगमिय जबाबदारी अंतर्गत केलेल्या खर्चाचे अध्ययन केले असता असे निदर्शनास येते की बँकेने शिक्षण, आरोग्य सेवा, लसीकरण, कौशल्य विकास, महिला व ज्येष्ठ नागरिक सक्षमीकरण, पर्यावरण, बाल शिक्षण, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन इ. बाबींवर खर्च केला आहे.

**संदर्भसूची**


- *https://csrcfe.org/about-csr-in-india-public-policy/*
- *https://thecsrjournal.in/state-bank-of-india-sbi-csr-corporate-social-responsibility-report/*
- *https://www.sbifoundation.in/*
- *SBI Annual Report 2019-20*
- *देहलीवाल प्रकाशन (2016), सचिवीय कार्यपद्धती, विश्व प्रकाशन नागपूर.*